MHYA110000302008 **नि.दि.दा.क्र. 35/2008**

## <u>नि.क्र. 95 वरील आदेश</u>

1. दावा अतिक्रमण काढुन मिळण्यासाठीचा आहे. प्रस्तुतचा अर्ज वादीने खाजगी सिव्हील इंजिनीअरची मोजणीसाठी कोर्ट कमिश्नर म्हणुन नेमणुक करण्यासाठी केलेला आहे.

2. वादीच्या कथनानुसार दिनांक 11/12/2014 रोजी नि. 01 खाली आदेश होउन तज्ञामार्फत मोजणी करण्याचे निर्देश या न्यायालयाने दिलेले आहेत. त्याप्रमाणे उपअधिक्षक भुमी अभिलेख उमरखेड यांची कोर्ट कमिश्नर म्हणुन करण्यात आली. परंतु त्याने मोजणी करण्यास असमर्थता दर्शविली. अशा परिस्थीतीत खाजगी इंजिनियर मार्फत दावा मिळकतीची मोजणी करण्यासाठी परवानगी मिळणेसाठी त्याने विनंती केली आहे. तसेच त्याने सिव्हील इंजिनियर संजय परसराम मुडे, रा.बस स्टॅड जवळ, उमरखेड यांचे नाव सुचविलेले आहे.

3. प्रतिवादीने अर्जास म्हणणे देउन विरोध केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार नि. 87 कडील कोर्ट कमिश्नरचा वादीचा अर्ज व नि. 90 वरील अर्ज अद्याप निर्णीत झालेला नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजुर करता येणार नाही. दावा मीळकती संदर्भात कोणताही शासकीय कागद उपलब्ध नाही. त्यामुळे मोजणी होणे शक्य नाही. म्हणुन त्याने अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

4. उभय पक्षकारातर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

5. अभिलेखाचे अवलोकन केले. जरी नि. 87 कडील अर्ज मंजुर झाला नसला तरी नि. 91 कडे वादीने कोर्ट कमिश्नरची फी भरण्यासाठी अर्ज दिला होता. तो अर्ज मंजुर झालेला आहे. तत्पुर्वी नि. 01 खाली दिनांक 11/12/2014 रोजी न्यायालयाने तज्ञा मार्फत मोजणी करून घेणे बाबत वादीला निर्देश दिलेले होते. त्याप्रमाणे ती फी भरण्याबाबत तो अर्ज दिला होता असे दिसुन येते. त्यानंतर नि. 93 कडे दिनांक 11/12/2014 च्या नि. 01 वरील आदेशाप्रमाणे मुदत घालुन मोजणीचा अहवाल दाखल करणेबाबत वादीने अर्ज दिला होता. त्यावर दिनांक 16/06/2015 रोजी कोर्ट कमिश्नर यांना दिनांक 11/12/2014 रोजीच्या आदेशाप्रमाणे मोजणी करण्याबाबत व 30 दिवसांच्या आत अहवाल दाखल करणे बाबत आदेश झाल्याचे दिसुन येते. त्यानंतर तसा

अहवाल मुदतीत न दिल्यामुळे कारणे दाखवा नोटीस काढणेसाठी नि.94 कडे वादीने अर्ज दिला होता. त्यावर दिनांक 20/07/2015 रोजी एका आठवडयाच्या आत अहवाल दाखल करणे बाबत कोर्ट कमिश्नर यांना आदेश झाल्याचे दिसुन येते. त्यानंतर वादीने प्रस्तुतचा अर्ज दिला. त्यावर दिनांक 18/01/2018 रोजी आदेश होउन कोर्ट कमिश्नर उपअधिक्षक भुमी अभिलेख उमरखेड यांना मोजणी करणे का शक्य नाही याचा अहवाल दाखल करणेसाठी आदेश झाला. त्याप्रमाणे उपअधिक्षक भुमी अभिलेख उमरखेड याने नि. 112 प्रमाणे खुलासा दाखल केला. त्या खुलाश्या प्रमाणे सदर गावात अद्याप गावठाण नगर भु–मापन योजना अद्याप लागु झाली नसल्याने गावठाणातील कोणत्याही मिळकतीचे अभिलेख त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे तशी मोजणी करणे योग्य होणार नाही व तशी मोजणी केलेली नाही. तसेच ती मोजणी करणे त्यांच्या कार्यक्षेत्रात येत नाही असा खुलासा त्यांनी दिला. त्यानंतर प्रस्तुत अर्जावर दिनांक 17/07/2018 रोजी आदेश होउन प्रस्तुतचा अर्ज चौकशीसाठी नेमण्यात आला.

6 वरील सर्व पार्श्वभुमीचा विचार करता नि. 87 वर आदेश झाला नाही म्हणुन प्रस्तुतचा अर्ज निर्णीत करता येणार नाही असे म्हणता येणार नाही. कारण नि.87 चा उद्येश नि.01 खाली दिनांक 11/12/2014 चे आदेशाने सफल झालला असुन प्रकरण त्यापुढेही गेलेले आहे. त्यामुळे नि.87 च्या अर्जाचे प्रयोजनच राहीलेले नाही. उपअधिक्षक भुमी अभिलेख,उमरखेड यांचा नि.112 चा खुलासा पहाता सदर गावात नगर भुमापण योजना लागु नसल्याने व तसा अभिलेख त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याने त्यांचे कार्यालया मार्फत मोजणी होण अशक्य आहे. परंतु नि.01 वरील दिनांक 11/12/2014 चे आदेशा प्रमाणे तज्ञामार्फत दावा मिळकतीची मोजणी आवश्यक आहे. अशा परिस्थितीत खाजगी मोजणीदाराशिवाय पर्याय नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे योग्य ठरते. वादीने सिव्हील इंजिनियर संजय मुडे यांचे नाव सुचविलेले आहे. त्यास प्रतिवादीने आक्षेप घेतलेला आहे. शिवाय त्यांनी कोणाचेही नाव सुचविलेले नाही. त्यामुळे संजय मुडे यांची कोर्ट कमिश्नर म्हणुन करणे उचित ठरते.

7. या सर्व बाबींचा विचार करुन खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो –

(अ) अर्ज मंजुर करण्यात येतो.

(ब) संजय परसराम मुडे रा.उमरखेड यांची कोर्ट कमिश्नर म्हणुन नेमणुक करण्यात येते. कोर्ट कमिश्नर यांनी मौजे अमडापुर येथिल ग्राम पंचायत मालमत्ता क्रमांक 176 व 177 ची मोजणी करून अहवाल सादर करण्याचा आहे. मोजणी पुर्वी उभय पक्षकारांना व त्यातील हिस्सेदारांना आगाउ नोटीसा देण्याचे आहेत.

(क) वादीने कोर्ट कमिश्नर यांची फी परस्पर देण्याचे असुन न्यायालयास कळविण्याचे आहे.

(ड) वादीने मोजणीसाठी आवश्यक सर्व कागदपत्रे उपलब्ध करण्याचे व आवश्यक तो खर्च सोसावयाचा आहे.

(अविनाश म. पाटील)
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर
उमरखेड

दिनांक : 01/07/2019